# नियमित दिवाणी मुकदमा क्र. २९/२०२१ नि. २७ वरील आदेश

भुजंग परब विरुध्द राजेश परब

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी कागदपत्र हजर करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

०२. वादी यांचे कथन असे की, प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक ते कागदपत्रे हजर करीत आहोत तरी हजर करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे देऊन हरकत घेतली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहीले, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले, तसेच उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी निशाणी २८ येथील फेरीस्तासोबत अ.क्र. १ ते ६ येथील कागदपत्र दाखल केलह आहेत. प्रस्तुतचे दस्तऐवज भारतीय पुरावा कायद्यानुसार वादीने शाबीत करणे आवश्यक आहे.

०५. त्यामुळे सदरचे दस्तऐवज हे दाव्याचे कामी अभिलेखावर सामिल करुन घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. त्यामुळे सदर दस्तऐवज सामिल करुन घेता येईल. परंतु, सदरील दस्तऐवज शाबीत केल्यानंतर त्यास निशाणी क्रमांक देणे उचित होईल. तसेच भारतीय पुरावा कायद्यात दस्तऐवज संबंधीचे दिलेली गृहितके सदरची कागदपत्रातील मजकूर शाबीत झाला किंवा कसे हे अंतिम युक्तीवादाचे वेळी विचारात घेता येईल. त्यामुळे सदर दस्तास अभिलेखावर दाखल करुन घेण्याची परवानगी देणे मला उचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. २७ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. नि.२८ च्या फेरीस्तासोबतचे कागपत्र अभिलेखावर हजर करुन घेण्यात येत आहेत.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.06.26 18:26:12 +0530

दिनांक– २६/०६/२०२४ (प.रा.ढोरे )

ठिकाण– कुडाळ. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.